# डॉ विजय मगदूम यांच्या वाढदिवसा निमित्त – डॉ जे जे मगदूम फार्मेसी कॉलेज चे जागरूक मतदार घडवण्याचे दिशादर्शक पाऊल




**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :**
डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे मा. चेअरमन डॉ. विजय जे. मगदूम यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित नवीन मतदार नोंदणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. तहसीलदार कार्यालय, शिरोळ व राष्ट्रीय सेवा योजना (छडड) यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेला हा उपक्रम केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता, सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारा ठरला. विशेष म्हणजे, या शिबिराचा मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.शिबिराचे उद्घाटन नायब तहसीलदार विनय कौलवकर यांच्या हस्ते झाले, तर महसूल सहाय्यक सचिन झेंडे व त्यांच्या सहकाऱ्यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी एक महत्त्वपूर्ण बाब अधोरेखित केली की, मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सर्वप्रथम मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. विधानसभा किंवा लोकसभा निवडणूक, कोणत्याही लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी मतदार नोंदणी ही पहिली आणि अत्यावश्यक पायरी आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. उपप्राचार्य डॉ. सतीश किलजे यांनी विद्यार्थ्यांना समाजाप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव करून देत, सक्रिय नागरिकत्वाचे महत्त्व पटवून दिले.आजच्या काळात युवकांमध्ये मतदानाबाबत काही प्रमाणात उदासीनता दिसून येते, ही चिंतेची बाब आहे. अशा परिस्थितीत महाविद्यालयीन स्तरावर आयोजित होणारी मतदार नोंदणी शिबिरे ही लोकशाहीची पायाभरणी अधिक मजबूत करणारी ठरतात. वाढदिवसासारख्या वैयक्तिक आनंदाच्या क्षणांना सामाजिक उपक्रमाशी जोडण्याची ही संकल्पना निश्चितच अनुकरणीय आहे. अशा उपक्रमांतूनच उद्याचे जबाबदार, सजग आणि कर्तव्यदक्ष नागरिक घडतील.

या उपक्रमासाठी संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस-चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम व कार्यकारी संचालक डॉ. सुनील आडमुठे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. शितलकुमार एस. पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. प्रणिल तोरसकर, प्रा. काशिनाथ हुलवान यांनी शिबिराचे नियोजन प्रभावीपणे केले.सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. प्रणिल तोरसकर व प्रा. सौरभ समडोळे यांनी केले.